# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/12/2023 (शनिवार) सकाळ

## काटोल , कळमेश्वर रोडवर क्वॉलीस व ट्रकचा आमोरासमोर अपघात

पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत सोनखांब गावाच्या जवळील डांबरी रोड येथे दिनांक १६/१२/२०२३ चे रात्री १२.३० वा. दरम्यान यातील गावातील श्री चंद्रशेखर चिखले यांची मुलगी सौ. पल्लवी हिचे लग्न झाल्याने तिच्या लग्न समारंभाचा कार्यक्रम नागपूर येथे चिखले यांचे घरी होता. त्यामुळे गावातील शेजारी मयुर मोरेश्वर इंगळे (गाडीचालक) सुधाकर रामचंद्र मानकर, विठ्ठल दिगांबर थोटे, रमेश ओमकार हेलोंडे, जगदीश दत्तुजी ढोणे आणि नातेवाईक वैभव साहेबराव चिखले, अजय दशरथ चिखले असे सात लोक मिळुन क्वॉलिस चारचाकी गाडी क्र. एम. एच. ३१ बि. डब्लु ११११ या गाडीत वरील नमुद लोक बसले आणि फिर्यादी व सोबत गावातील सतिश मुरलीधर कापसे, निलेश गोतमारे, बबलू गफार बराडे, राजेंद्र सुपूटकर, मनोहर हेलोंडे आणि पुरूषोत्तम कोहळे फिर्यादी व त्यासोबतचे ०६ लोक बोलेरो गाडी एम. एच–४० के. आर–०५६६ मध्ये बसुन सोबत दोन्ही गाडया मिळून नागपुर करीता रात्री ०८.०० वा. सुमारास निघुन तिथे पोहचुन कार्यक्रम आटपवुन ११.०० वा. सुमारास घरी मेंढेपठार येथे येण्यास दोन्ही नमुद गाडीतील सर्व लोकांसह येण्यास निघाले तेव्हा फिर्यादी समोर क्वॉलिस क्र गाडी क्र. एम. एच. ३१ बि. डब्लु ११११ होती तिचे पाठीमागे काही अंतराने फिर्यादीची बोलेरो गाडी चालत होती समोरील क्वॉलिस गाडी सोनखांब गाव क्रॉस करूण डांबरी रोडच्या डाउन भागातुन १२.३० वा सुमारास जात असता काटोल कडुन समोरून येणारा ट्रक क्र. एम. एच –४० ए. के.–३८१७ हा २५ टन सोयाबीन (ओव्हरलोड नसलेला) घेवुन सोनखांब येथील शालीमार ऑईल फॅक्ट्री येथे जात असता ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणारी क्वॉलीस गाडीला समोरून धडक दिली तेव्हा फिर्यादी व त्याच्या सोबतचे गाडीतील सर्व लोकांनी अपघाताच्या ठिकाणी धाव घेतली क्वॉलिस गाडीतील वरील नमुद गाडी चालक नामे –मयुर मोरेश्वर इंगळे आणी ड्रायविंग सिटचे मागे बसलेले रमेश ओमकार हेलोंडे यांना डोक्याला मार लागुन जागिच मरण पावले गाडीत बसलेले सुधाकर रामचंद्र मानकर, विठ्ठल दिगांबर थोटे, जगदीश दत्तुजी ढोणे, वैभव साहेबराव चिखले, अजय दशरथ चिखले यांना हि दुखापत झाल्याने सोनखांब येथुन उपचारा करीता नागपुर कळमेश्वर येथे नेत असता सुधाकर रामचंद्र मानकर आणी अजय दशरथ चिखले हे कळमेश्वर येथे शासकीय रूग्णालय येथे पुढील वैद्यकीय उपचाराकरीता नेले असता तेथे मरण पावले असुन वैभव साहेबराव चिखले, जगदीश ढोणे आणि विठ्ठल थोटे यांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे रेफर केले असता त्या ठिकाणी वैभव साहेबराव चिखले व विठ्ठल दिगांबर थोटे हे तेथे उपचारा दरम्यान मरण पावले. जखमी जगदीश ढोणे यांचा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर येथे उपचार सुरू आहे.

पोस्टे काटोल येथे माहिती प्राप्त होताच पोलीस स्टेशनचे वाहनाने पोलीस उपनिरीक्षक श्री. परमेश्वर आगासे हे तात्काळ आपल्या स्टाफसह अवघ्या १५ मिनीटात घटनास्थळी पोहोचले. सदर प्रकरणी पोस्टे काटोल येथे अप. क्र. १४३७/२३ कलम २७९, ३३७, ३३८, ३०४ (अ) भादंवि सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर गुन्हयातील आरोपी ट्रक चालकास गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. सदर घटनेची माहिती होताच मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, उपविभागीय पोलीस अधिकारी काटोल विभाग श्री. बापु रोहम, पोलीस निरीक्षक काटोल येथील ठाणेदार श्री. निशांत मेश्राम तसेच सहायक पोलीस निरीक्षक जिल्हा वाहतुक शाखा रविंद्र

मस्कर यांनी घटनास्थळी तात्काळ भेट दिली तसेच फॉरेन्सिक लेबोरटरी टिम घटनास्थळी पाचारण करण्यात आली होती. सदर अपघातस्थळी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक नागपूर परीक्षेत्र नागपूर श्री. छेरींग दोरजे यांनी भेट दिली आहे. तसेच मा. पोलीस अधिक्षक यांनी तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम पोस्टे काटोल यांना योग्य त्या सुचना दिल्या आहेत.

जिल्हयात अपघाताचे प्रमाण पाहता मागील सन २०२२ च्या नोव्हेंबर पावेतोचे तुलनेमध्ये सन २०२३ नोव्हेंबर पावेतो १८ टक्क्याने अपघाताचे प्रमाणे कमी झालेले आहे. अपघाताचे प्रमाणे कमी होण्यासाठी योग्य ती कारवाई व उपाययोजना मा. पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**